


गंगाधर महाम्बरे

## डॉ. जयंत नारळीकर

आयुका,
पोस्ट बॅग ४
गणेशखिंड,
पुणे ४११००७

श्री. महाम्बरे यांस,

सप्रेम नमस्कार.

काही दिवसांपूर्वी आपण पत्ररूपाने विज्ञानकथा-साहित्यावर माझे विचार मांडण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून हे पत्र.

'माझे' विचार हे माझे वैयक्तिक विचार आहेत हे प्रारंभीच स्पष्ट केलेले बरे. माझ्या काही मर्यादा आणि उणीवा देखील नमूद करतो. केवळ शब्द संख्येने मोजले तर माझ्यापेक्षा कितीतरी जास्त विज्ञानकथा लेखन केलेले मराठी लेखक आहेत. विज्ञानकथालेखनाला माझ्यापासून सुरवात झाली (—मराठी भाषेपुरतेच बोलतोय!) हे म्हणणेही बरोबर नाही. मराठीतील विज्ञानकथासाहित्यावर संशोधन प्रबंध लिहून डॉक्टरेटचा शिक्का मला मिळालेला नाही. 'कथेचे तंत्र' कसे असावे याची मला माहिती नाही आणि त्यावर विद्वान टीकाकारांनी विद्वत्ताप्रचुर भाषेत केलेली भाष्ये बहुतकरून माझ्या डोक्यावरून जातात. 'सत्यकथा' आणि 'आलोचना' यांचा स्तर मला कधीच गाठता आला नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे माझे लेखन 'स्वान्तः-सुखाय' आणि 'सांगेन गोष्टी विज्ञानाच्या चार' म्हणून असते. क्रिकेटच्या भाषेत, मी रस्त्यावर स्टंप्स मांडून मिळेल त्या बॅटबॉलने खेळणाऱ्यांपैकी आहे, कसोटीवीर नाही.

मी हे असे लेखन का करायला घेतले? सुरवात केली ती नेमकी अमुक एका वेळीच का केली? आणि ज्या प्रेरणेने आणि उद्देशाने सुरुवात केली तेच आजही लागू आहेत का?

१९७४ साली, वयाच्या सदतीसाव्या वर्षात मी माझी पहिली विज्ञानकथा 'कृष्णविवर' लिहायला घेतली. आपण सध्या 'विज्ञानयुगात' वावरतो म्हणजे नेमके काय? विज्ञान आणि विज्ञानजनित तंत्रज्ञान आज आपल्या जीवनात खोलवर गेले आहे. आपली दिनचर्या तपासून पाहिली की याचा प्रत्यय येतो. आजच्या विज्ञानातून उद्याचे तंत्रज्ञान बाहेर निघते ज्याचा उद्याच्या जीवनावर असाच प्रभाव पडणार. तेव्हा विज्ञानाचे आजचे आणि उद्याचे चित्र रेखाटून जनसामान्यापुढे कथारूपाने ठेवता येईल का? निदान तसा प्रयत्न तरी करून पहावा असे मला वाटत होते, आणि आजही वाटते.

तरुण वयात, संशोधनाच्या प्रारंभीच्या काळात वैज्ञानिकाचे बहुतेक लक्ष आपल्या विषयापुरते केंद्रित असते. कालानुसार त्याचा अनुभव वाढतो; विज्ञानाचे,

वैज्ञानिकांचे आणि भोवतालच्या समाजाचे विविध पैलू त्याला दिसू लागतात. त्या वाढत्या अनुभवाचे चित्रीकरण करणे त्याला हळू हळू जमू शकते आणि तसे करण्याची इच्छा पण होऊ लागते. निदान माझ्या बाबतीत तरी तसे झाले.

१८७४ मध्ये ब्लॅक होलची कल्पना खगोलशास्त्रात लोकप्रिय होत होती. ह्या विचित्र वस्तूचे गुणधर्म आइन्स्टानच्या सिद्धान्तातून व्यक्त होत होते आणि त्यांचा उपयोग अंतराळातील विविध घटनांच्या कारण-मीमांसेसाठी होऊ शकेल असे बऱ्याच खगोलशास्त्रज्ञांना वाटत होते. तेव्हा अशा वस्तूचा उपयोग एखादी मनोरंजक कथा लिहिण्यासाठी होऊ शकेल असे मला वाटले.

त्याच सुमारास मराठी विज्ञान परिषदेची विज्ञानरंजक कथा स्पर्धा जाहीर झाली होती. 'ब्लॅकहोल'चे भाषांतर 'कृष्णविवर' असे करून मी माझ्या डोक्यात घोळत असलेली गोष्ट लिहून काढली. परिषदेकडे पाठवताना वेगळे नाव आणि हस्ताक्षर वापरले ('नारायण विनायक जगताप'ची आद्याक्षरे माझ्या नावाच्या आद्याक्षरांच्या उलटया क्रमांकाने आहेत.) त्या कथेला पहिले पारितोषिक मिळाले आणि मला पहिल्यांदा वर्गात पहिला नंबर आला (दुसऱ्या इयत्तेत!) त्या वेळच्या आनंदाची पुनरावृत्ती झाली असे वाटले.

त्यानंतर मुकुंदराव किर्लोस्करांनी दिलेल्या उत्तेजनामुळे मी 'किर्लोस्कर' आणि इतर मराठी नियतकालिकांसाठी कथा लिहू लागलो. परंतु 'ऑन डिमांड' दिवाळी अंकासाठी कथा पाठविणे मला कधीच जमले नाही. 'कथा = नवी कल्पना + त्याभोवतालचे कथाविश्व + रिकामा वेळ' हे समीकरण सुटेल तेव्हाच कथा लिहून पूर्ण होते. आजही ह्या समीकरणातल्या शेवटच्या भागासाठी एक विज्ञान कादंबरी अडकून पडली आहे.

विज्ञानकथेकडून मला नेमके काय अभिप्रेत आहे?

काय अभिप्रेत नाही ते सांगणे अधिक सोपे! चमत्कार, परीकथा किंवा भयकथा यांना विज्ञानकथा म्हणता येत नाही. माझ्या मते तथाकथित अशा बऱ्याच विज्ञानकथांत वरचा थोडा मुलामा काढला तर ह्याच गोष्टी दिसून येतात. 'स्टारवॉर' आणि त्यानंतरचे दोन चित्रपट, 'स्पेस'चा मुलामा काढल्यावर केवळ 'अमेरिकन वेस्टर्न'सारखे वाटतात. त्यांना मी विज्ञानकथेचे चित्रपट म्हणू शकत नाही.

विज्ञान वस्तुनिष्ठ आणि तथ्यावर आधारलेले असते पण त्यामुळे विज्ञानकथा पूर्णपणे वास्तववादी असायला पाहिजे असे नाही. एखाद्या दूरदर्शी विज्ञानकथेत रेखाटलेले चित्र आजच्या विज्ञानाला नाही तरी उद्याच्या विज्ञानाला वास्तववादी वाटावे. ज्यूल्सव्हर्नची चंद्रप्रवासाची कादंबरी हे याचे एक उदाहरण. विज्ञानकथा लेखकाचे कौशल्य भविष्यकाळ अशातऱ्हेने साकार करण्यात दिसून येते. प्रत्येक विज्ञानकथा भविष्यात साकार व्हावी असेही नाही परंतु त्यात रंगवलेले चित्र शक्य कोटीत (आज नाही तर उद्या) बसले तरी चालेल.

विज्ञानतंत्रज्ञानाच्या गरुडझेपेत हेलावलेला मानव समाज कसा आहे याची चुणूक विज्ञानकथेत कुठेतरी लागावी असे मला वाटते. वेगवेगळ्या परस्परविरोधी भूमिका घेणारे वैज्ञानिक, वैज्ञानिक घडामोडीकडे पाहण्याचे समाजातले वेगवेगळे दृष्टिकोन, समाजातर्फे विज्ञानाला पैसा पुरवणारे नोकरशहा, तंत्रज्ञानाच्या उत्तम आणि वाईट वापराचे परिणाम, ...अशा कितीतरी गोष्टी विज्ञानकथेत डोकावू शकतात. थोडक्यात म्हणजे अंतराळात फिरणारी विचित्र याने आणि त्यांतून जाणारे चित्रविचित्र जीव ह्या 'गरम मसाल्या'पेक्षा वरील सकस आहाराच्या गोष्टी विज्ञानकथेला दर्जा देऊ शकतात.

लोकरंजनापेक्षा लोकप्रबोधनासाठी लिहिलेली विज्ञानकथा 'कथा' असू शकते काय?

मी म्हणेन 'होय', जर लेखकाने उपदेशामृत न पाजता त्याला हवे असलेले उद्दिष्ट गोष्टीरूपाने साध्य केले तर! उदाहरणार्थ अंधविश्वासाविरूद्ध विज्ञानकथा लेखन हा एक उत्कृष्ट उपाय होऊ शकतो, आणि तसे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन मी काही कथा लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. ती भट्टी कितपत जमली आहे ते वाचकांनीच ठरवावे. भोपाळ दुर्घटना डोळ्यापुढे ठेऊन जर कोणी प्रदूषणाचे धोके दाखवणारी कथा लिहिली तर तिला विज्ञानकथा म्हणायला माझी काहीच हरकत नाही. हे आवर्जून सांगण्याचे कारण मी एक असा मतप्रवाह ऐकला आहे की काही हेतू डोळ्यासमोर ठेऊन लिहिलेले लेखन 'साहित्य' ठरू शकत नाही. मला ते पटत नाही.

कराडच्या साहित्यसंमेलनात दुर्गाबाईंनी विज्ञान-

कथेचा आवर्जुन उल्लेख केला. परंतु अजूनही साहित्य संमेलनात विज्ञानकथेला स्थान प्राप्त झालेले दिसत नाही, असे का व्हावे ?

याचे एक कारण म्हणजे विज्ञान आणि साहित्य यांच्यातली दरी अद्याप भरून निघाली नाही. साहित्यिकांना आपली प्रभावी लेखणी विज्ञानाकडे वळवण्यात एक प्रकारचा न्यूनगंड वाटतो... ‘विज्ञान आपल्या समजण्यापलिकडची गोष्ट, आपण त्यावर काय लिहिणार ?’ त्याउलट वैज्ञानिकांना एक प्रकारचा अहंगंड असतो ‘ आपण जर गोष्टी लिहिण्याच्या भानगडीत पडलो तर आपला संशोधनाचा स्तर खाली येईल. ’ ई. एम. फॉर्स्टर सारख्या प्रतिष्ठित (आणि वैज्ञानिक शिक्षणाचा गंध नसलेल्या (साहित्यिकाने उत्कृष्ट विज्ञानकथा लिहिली तर फ्रेड हॉयेल सारख्या प्रख्यात शास्त्रज्ञाने पुष्कळ प्रभावी विज्ञानकथा लेखन केले. ह्या गोष्टी पाश्चात्य जगतात देखील अपवादात्मक आहेत पण विज्ञान आणि साहित्य यांच्यात दुवा साधू शकतो हे सिद्ध करतात.

परंतु विज्ञान कथा ही शेवटी एक कथा आहे आणि ती साहित्यात सामावून घेण्याची जबाबदारी साहित्यिकांची आहे. म्हणून ‘साहित्यसूची’त मी हे पत्र आपणास लिहीत आहे. साहित्य संमेलनात विज्ञानकथेवर परिसंवाद व्हायला पाहिजेत, विज्ञानकथा वाचन झाले पाहिजे आणि मुख्य म्हणजे प्रतिष्ठित साहित्यिकांनी, ज्यांनी पुष्कळ उत्कृष्ट लिखाण केले आहे अशांनी, रचनात्मक टीका करून विज्ञानकथेचा दर्जा वाढवण्यात हातभार लावला पाहिजे. साहित्य संमेलनात विज्ञानकथा लेखकांची छायाचित्रे लावण्यापेक्षा त्यांना वरील प्रकारांनी मार्गदर्शन झाल्यास ह्या साहित्यप्रकाराचा दर्जा उंचावेल.

माझे मनोगत थोड्या स्पष्ट शब्दात मांडल्याबद्दल क्षमस्व आणि मांडायची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

कळावे.

आपला
जयंत नारळीकर

(डॉ. जयंतराव नारळीकर यांचे विज्ञानक्षेत्रातील अनन्यसाधारण कर्तृत्व सर्वांसमोर आहे. आजच्या मराठी विज्ञान कथेला मराठी साहित्यामध्ये प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या हाताच्या बोटावर मोजता येतील अशा लेखकमंडळींमध्ये नारळीकरांचा समावेश होतो. तीस पस्तीस वर्षांपूर्वी जाणीवपूर्वक विज्ञानकथा लेखन करणारे श्री. द. पां. खांबेटे म्हणत असत की इतर कथा जशाच्या तशा इंग्रजीतून मराठीमध्ये आणून मराठीतील कथाधन वाढवता येईल; परंतु इंग्रजीतून विज्ञान कथा मराठीमध्ये आणताना त्यातील आशय मराठी वाचकांना किती पचवता येईल त्याचा नक्की अंदाज अनुवादकाला बांधता आला पाहिजे. कारण मूळच्या कथेच्या वातावरणाशी आणि पात्र, घटना इत्यादींशी तर मराठी वाचकांचा सुसंवाद घडला नाही जर केवळ अनुवाद करण्याच्या पलीकडे अशा अनुवादकाला काही साध्य होणार नाही.

खऱ्याखुऱ्या विज्ञानकथेला आपल्याकडे डॉ. जयंतराव नारळीकरांनी विज्ञान कथा लिहून सुरवात केली असा काहीजणांमध्ये समज आहे. याबाबत खुद्द डॉ. नारळीकर यांचे कोणते मत आहे, तसेच त्यांनी असे लेखन करायला का घेतले यासंबंधीचे विचार प्रत्यक्ष त्यांच्याकडूनच समजून घ्यावेत या हेतूने मी त्यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. या पत्राला त्यांनी पाठविलेले हे उत्तर या विषयाची आस्था आणि कुतूहल असलेल्या अनेकांना उद्‌बोधक वाटेल. या पत्रामध्ये विज्ञानकथा या प्रकाराला साहित्यिक दर्जा प्राप्त व्हावा ही डॉ. नारळीकरांची आत्यंतिक तळमळही दिसते. मराठीमध्ये जेव्हा कधी यापुढे विज्ञानकथेची समीक्षा तपशीलवार करण्याचा प्रयत्न होईल तेव्हा त्या लेखकाला ‘ साहित्यसूची ’तील डॉ. नारळीकर यांच्या या पत्रातील विचारांचा परामर्श घ्यावाच लागेल यात शंका नाही.)

गंगाधर महाम्बरे

---

शिवरंजनी, कलानगर, पुणे—सातारा रस्ता, पुणे